दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ : मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप |
उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड महाराष्ट्र | गुरुवार, | दि. 17 एप्रिल 2025 |
| अंक क्र. 321 | वर्षे 2 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

वेव्हज् : मनोरंजनाची सर्वसमावेशक चळवळ 2
3 खरे संस्कार
4 या देशाला बाबासाहेबांच्या विचारांची गरज : मुख्य अभियंता सुनिल इंगळे



# बीड जिल्ह्यात होणार टाटा टेक्नोलॉजीचा सीआयआयटी प्रकल्प

## 191 कोटीच्या प्रकल्पास मिळाली मान्यता



## ना. पंकजाताई मुंडे यांनी मानले पालकमंत्री अजित पवार यांचे आभार !

**बीड – प्रतिनिधी**

बीडमध्ये लवकरच तरुणांना रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. अजित पवार यांनी नुकतंच त्यांच्या अधिकृत ट्विटरवरुन एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी बीड जिल्ह्यासाठी आनंदाची बातमी..! असे म्हटले आहे. बीडमध्ये लवकरच तरुणांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. यासाठी टाटा टेक्नॉलॉजी कंपनी जिल्ह्यात तब्बल १९१ कोटी रुपये खर्चून एक नवीन प्रशिक्षण केंद्र (सीआयआयआयटी) उभारण्यात येणार आहे, असे अजित पवार म्हणाले.

जगप्रसिद्ध टाटा टेक्नॉलॉजी कंपनी बीड जिल्ह्यात सीआयआयटी प्रकल्प उभारणार आहे. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी मान्यता मिळाल्याने लवकरच हा प्रकल्प बीड जिल्ह्यात कार्यान्वित होणार आहे. एकूण एकशे एक्यानव कोटी रुपयांच्या खर्चातून उभारला जाणार हा प्रकल्प बीड जिल्ह्यातील होतकरू तरुणांसाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. जिल्ह्याच्या रोजगार आणि उद्योग क्षेत्राला गती देणारी संस्था जिल्ह्यात आणल्या बद्दल राज्याच्या पर्यावरण आणि पशूसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांचे आभार मानले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रबळ निर्णय क्षमतेमुळे जिल्ह्यात होत असलेला हा प्रकल्प तरुणांना स्वयंरोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून देणारा आहे. जिल्ह्याच्या उद्योग क्षेत्राला देखील या प्रकल्पाचा फायदा होणार असून रोजगार वाढीच्या दृष्टीने देखील सीआयआयआयटी प्रकल्प फलदायी ठरणार आहे. टाटा समुहाच्या या प्रकल्पामुळे तरुणांच्या कौशल्याला वाव मिळणार असून जिल्ह्यातील सात हजार तरुणांना प्रतिवर्षी वैश्विक स्तराचे दर्जेदार प्रशिक्षण मिळणार आहे. औद्योगिक आणि तांत्रिक शिकवण देणारा हा प्रकल्प जिल्ह्यातील युवकांसाठी अनेक संधी खुल्या करणारा असल्याची भावना व्यक्त करून ना. पंकजाताई मुंडे यांनी अजित दादा पवार यांचे आभार मानले आहेत.नवीन सेंटरमधून दरवर्षी ७ हजार युवकांना जागतिक दर्जाचं औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण दिलं जाणार आहे. त्यातून बीड जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, ही अत्यंत समाधानाची बाब आहे, असेही अजित पवारांनी सांगितले.

**दरवर्षी 7 हजार युवकांना जागतिक दर्जाचं औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण दिलं जाणार**

## यंदा ८० लाख टन साखरेचे उत्पादन

**मुंबई वृत्तसंस्था**

यंदा उसाचा गळीत हंगाम समाप्त झाला आहे. या हंगामात एकूण २०० कारखाने सुरू झाले होते, त्यापैकी १९९ कारखान्यांची धुराडी बंद झाली आहेत. राज्यात एकमेव पुणे जिल्ह्यातील 'विघ्नहर' सहकारी साखर कारखाना सुरू आहे, तोही आठ दिवसांत बंद होईल. दरम्यान, बुधवारअखेर ८० लाख टन निव्वळ साखर उत्पादन झाले आहे. उपपदार्थ वगळता निव्वळ साखर उतारा ९.४८ मिळाला आहे.

राज्याचा यंदाचा गळीत हंगाम सुरुवातीपासून विविध कारणांमुळे अडचणीत आला आहे. उसाची उपलब्धता कमी असल्यामुळे एक महिना उशिराने, १५ नोव्हेंबरपासून हंगाम सुरू झाला. तरीही कारखान्यांना उसाचा तुटवडा जाणवला. उसाचा तुटवडा आणि अपेक्षित थंडी न मिळाल्यामुळे साखर उताराही कमी आला आहे. यंदाच्या हंगामात ९९ सहकारी आणि १०१ खासगी, असे २०० कारखाने सुरू होते. या कारखान्यांनी बुधवारअखेर सुमारे ८५२ लाख टन उसाचे गाळप करून ८० लाख टन साखर उत्पादन घेतले आहे.

ठराविक कारखाने वगळता यंदाच्या हंगामाची स्थिती वाईट आहे. कारखान्याचे गाळप सरासरी १४० दिवस चालल्याशिवाय कारखाने फायद्यात येत नाहीत. पण, यंदाचा हंगाम सरासरी ८३ दिवस चालला. हा हंगाम अत्यंत कमी दिवसांचा ठरला. एकीकडे खर्च वाढला, दुसरीकडे गाळपाचे दिवस कमी झाल्यामुळे कारखान्यांवर आर्थिक बोझा वाढला आहे. परिणामी ९० टक्के कारखान्यांचे ताळेबंद तोट्यात आहेत.

### कारखाने आर्थिक अडचणीत

- **कोल्हापूर विभाग ऊस गाळप, साखर उत्पादन आणि उताऱ्यात आघाडीवर आहे. येथील चाळीस कारखान्यांनी २०२ लाख टन उसाचे गाळप करून सरासरी ११.०८ टक्के साखर उताऱ्याने २२ लाख टन साखर उत्पादन घेतले आहे.**
- **सोलापूर विभागाला उसाच्या तुटवड्याचा मोठा फटका बसला आहे. हंगाम लवकर संपल्यामुळे कारखाने आर्थिक अडचणीत आले आहेत. साखर आयुक्तालयाने नुकतेच पंधरा कारखान्यांना थकीत देयकाच्या वसुलीसाठी नोटीसा काढल्या आहेत, त्यात सोलापुरातील १० कारखान्यांचा समावेश आहे.**



## होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करणे हीच वंचितची सामाजिक बांधिलकी : मिलिंद घाडगे

**परळी प्रतिनिधी**

होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करणे हीच वंचित बहुजन आघाडीची सामाजिक बांधिलकी असल्याचे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांनी केले.विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून वंचित बहुजन आघाडी परळीच्या वतीने शहरातील भगवान प्राथमिक विद्यालय परळी या शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्यध्यापक दहिफळे एल. एम. हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून वंचितचे ता. अध्यक्ष गौतम साळवे, वंचितचे ता. युवा अध्यक्ष राजेश सरवदे, ता. उपाध्यक्ष आदर्श जंगले, शहर उपाध्यक्ष संदीप ताटे, शहर प्रसिद्धीप्रमुख केशव कांबळे हे उपस्थित होते.




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मिलिंद घाडगे यांनी सांगितले की विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य प्रचंड मोठे आहे. या देशांमध्ये दीनदलीतांना वंचित, उपेक्षितांना शिक्षणाची संधी नाकारली असताना सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रचंड अडचणीतून आपले शिक्षण पूर्ण करून विदेशातील अनेक डिग्ऱ्या मिळवल्या. व बहुजन समाजाला समजावून सांगितले की तुमचे दैन्य दारिद्र्य जर तुम्हाला घालवायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही.म्हणून आपल्या मुलांना शाळेत पाठवा उच्च शिक्षण द्या तरच तुमचं दैन्य दारिद्र्य नाहीसे होणार आहे असे सांगितले. एवढ्यावरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर थांबले नाहीत तर या देशाचं संविधान लिहून सर्वांना शिक्षणाची समान संधी देऊन मोफत शिक्षणाची व्यवस्था निर्माण केली.

शिक्षणाच्या माध्यमातून मुलींना सुद्धा समान संधी देऊन या देशातील सर्व जाती-धर्माच्या महिलांना चूल आणि मूल या साखळदंडातून मुक्त केले म्हणूनच या देशातील महिला राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री,व प्रशासनातील मोठमोठ्या अधिकारावर मुलींना काम करता आले. म्हणूनच या देशातील एससी, एसटी, ओबीसी आणि सर्व जाती धर्मातील महिलांनी त्यांचा आदर्श हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनाच मानायला हवे. कारण या देशामधला कुठलाच देव किंवा देवी वंचित उपेक्षित व अनेक जाती धर्मातील महिलांचे दुःख आणि दारिद्र्य घालवायला पुढे आला नाही. पुढे आले ते फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकरच असे मत मिलिंद घाडगे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाला अशोक वेडे सर, सचिन अंबाड सर, महेंद्र वाघमारे सर, राजेश विभुते सर, सुनील चव्हाण सर, गोविंद मुंडे सर, सचिन गवळी सर, संघमित्राताई वाघमारे मॅडम, सिंधुताई सोनवणे मॅडम, अंजलीताई कुलकर्णी मॅडम इत्यादी शिक्षक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बंडू आघाव सर यांनी केले तर आभार प्रदर्शन दत्तात्रय तिडके सर,यांनी केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## पाणि बचतीची सुरुवात स्वत:पासून करा;तरच आपल्याला दुष्काळ जाणवणार नाही : तहसिलदार वैशाली पाटील



**आष्टी प्रतिनिधी**

पंधरा वीस वर्षापुर्वी बोअर जर घेतला तर १५०-२०० फुटापर्यंत लागत होते.आता परिस्थिती बदलली असून,किमान ५००-६०० फुट खोल बोअर घेतला तरी पाणि लागत नाही.पाण्याची ही परिस्थिती भयानक आहे. त्यामुळे शासनाने आयोजित केलेल्या जलव्यवस्थापन कृती पंधरवडा आयोजित केला असून,यातून आपल्याला पाण्याचे महत्व पुढील पिढीला पाणि मिळावे म्हणुन प्रामाणिक पणे करून येणा-या काळात पावसाचे पाणि जमिनीत सोडून पाणि बचतीची सुरूवात स्वतः पासुन सुरूवात करा तरच आपल्याला दुष्काळ जाणवणारा नसल्याचे प्रतिपादन तहसिलदार वैशाली पाटील यांनी केले. राज्य शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत 15 ते 30 एप्रिल कालावधीत 'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा' साजरा केला जात असून,आष्टी तहसिल कार्यालयातील सभागृहात मंगळवार (दि.१५)सकाळी ११.३० वा.आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात तहसिलदार पाटील बोलत होत्या.यावेळी व्यासपीठावर जलदुत प्रा.राम बोडखे जलसंपदा विभागाचे उप अभियंता वैभव पारखे,नायब तहसिलदार प्रकाश सिरसेवाड,नायब तहसिलदार बाळदत्त मोरे, अश्विनी पडोळे, यांच्यासह आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.पुढे बोलतांना तहसिलदार पाटील म्हणाल्या,या पंधरवड्याच्या माध्यमातून जलसाक्षरतेसाठी विविध उपक्रम राबवून जल व्यवस्थापनावर अधिक भर दिला जाणार आहे.तसेच विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून जनजागृतीचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सिंचन व्यवस्था,कालवे दुरुस्ती, कालव्यातून होणारी गळती रोखण्यासाठी जलव्यवस्थापन कृती पंधरवडा मध्ये कालव्यांची स्वच्छता करण्यात येणार आहे. यासाठी स्थानिक प्रशासन आणि नागरिकांच्या सहभाग नोंदविण्याचे आवाहन त्यांनी केले.

जलदुत प्रा.राम बोडखे म्हणाले,जर आत्ता आपण जर व्यवास्थापन आत्ता करावे लागेल आपण आत्ता पाणि बचत केली नाही तर पुढचे युध्द हे पाण्यासाठी करावे लागणार आहे.त्यामुळे प्रत्येक नागरीक,शेतक-यांनी पाणी बचतीसाठी पुढील पंधरा दिवस करावे असे आवाहन त्यांनी केले.यावेळी उपस्थित अधिकारी,शेतकरी यांना जलप्रतिज्ञा ची शपथ दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बबन झगडे यांनी करून आभार मानले.


# वेव्हज् : मनोरंजनाची सर्वसमावेशक चळवळ

**मनोरंजन व्यवसायात योगदान देणाऱ्या विविध घटकांना एका मंचावर आणून त्यांना परस्पर सहकार्याची आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या देवाण-घेवाणीची संधी उपलब्ध करून देणाऱ्या वेव्हज शिखर परिषद आणि व्हेज बाजाराविषयी**

भारत हा मनोरंजन आणि माध्यम उद्योग जगतातला एक आघाडीचा आणि तितकाच महत्त्वाचा देश. भारतात या उद्योग क्षेत्राची प्रगतीही तितक्याच झपाट्याने होत आहे आणि त्यासोबतच या परिसंस्थेच्या अवकाशात सातत्याने होत असलेल्या बदलांसह हे क्षेत्रही तितक्याच सातत्यपूर्णतेने बहरत चालले आहे. आज या क्षेत्राकडे नीट पाहिले तर विविध व्यासपीठांवरच्या आशय निर्मितीनेही मोठी उसळी घेतल्याचे दिसते. यामागचे कारण म्हणजे देशातील वाढत्या डिजिटल प्रसारण सेवा, प्रादेशिक भाषांमधील आशय सामग्री निर्मिती आणि सातत्याने नव्या, खिळवून ठेवणाऱ्या, सर्वसमावेशकतेची जाणीव करून देणाऱ्या आशयाची वाढती मागणी करत असलेला देशातला तंत्रज्ञानस्नेही प्रेक्षक वर्ग. त्यामुळेच तर आता भारतासाठी हे क्षेत्र केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून मर्यादित राहिलेले नसून, हे भारतासाठी सांस्कृतिक अभिव्यक्ती, आर्थिक विकास आणि जागतिक पटलावर आपला प्रभाव पाडण्याचे एक सामर्थ्यशाली माध्यम झाले आहे. लवकरच मुंबईत जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषद (World Audio Visual & Entertainment Summit - WAVES) होणार आहे. येत्या १ ते ४ मे २०२५ दरम्यान महाराष्ट्रात, मुंबई इथे ही शिखर परिषद होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे भारत सरकारनेच या परिषदेचे आयोजन केले आहे. ही परिषद जागतिक पटलावर भारताच्या वाढत्या महत्त्वाचे प्रतिबिंब असलेला एक मंच ठरणार आहे आणि वेव्हज बाजार हा या शिखर परिषदेअंतर्गतचाच एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. खरे तर गेल्या अनेक दशकांपासून मी या क्षेत्रातच जगतो, वावरतो आहे. या इतक्या प्रदीर्घ काळातील माझ्या स्वत:च्या अनुभवांवरून मी एक गोष्ट खात्रीने सांगू शकतो ती म्हणजे कथात्मक मांडणीत लोकांना एकत्र आणण्याची, त्यांना प्रेरित करण्याची आणि एकुणात परिवर्तन घडवून आणण्याची मोठी ताकद असते. याच पार्श्वभूमीवर वेव्हज आणि वेव्हज बाजाराच्या माध्यमातून भारताने जागतिक मनोरंजन क्षेत्रासाठी एका व्यापक सहकार्यपूर्ण भागीदारीचे आणि सर्वसमावेशक भविष्य घडवण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

खरे तर वेव्हज बाजार ही ऑनलाइन बाजारपेठेसाठी आखली गेलेली एक क्रांतिकारक संकल्पना आहे. ही ऑनलाइन बाजारपेठ म्हणजे जागतिक मनोरंजन परिसंस्थेअंतर्गतचे व्यावसायिक तज्ज्ञ, उद्योग - व्यवसाय, आणि कलाकारांना परस्परांसोबत जोडून देणारे माध्यम ठरणार आहे. या बाजारपेठेअंतर्गत या क्षेत्रातील परस्पर सहकार्य सुलभ करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले गेले आहे. याद्वारे या क्षेत्रातील व्यावसायिक तज्ज्ञांना नव्या संधी शोधण्याची आणि सहकार्यपूर्ण भागीदारी स्थापित करण्याची संधी मिळणार आहे. या बाजारपेठेला माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील एक अभिनव व्यवसाय केंद्र म्हणून स्थान मिळवून देण्याचाच सरकारचा प्रयत्न आहे. भारताचे माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी 27 जानेवारी २०२५ रोजी या अभिनव बाजारपेठेचे औपचारिक उद्घाटन केले होते. आर्थिक क्षेत्रात दावोस शिखर परिषदेचे स्थान आहे, तेच मनोरंजन क्षेत्रात वेव्हज शिखर परिषदेला मिळवून देण्याचा दृष्टिकोन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला होता. त्या दृष्टीने वेव्हज बाजार महत्त्वाचे साधन ठरणार आहे.

वेव्हज बाजाराच्या अधिकृत संकेतस्थळावर आतापर्यंत, माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राशी संबंधित विविध क्षेत्रांमधील सुमारे ५५०० खरेदीदार, २००० पेक्षा जास्त विक्रेते आणि जवळपास १००० प्रकल्पांसाठी नोंदणी केली गेली आहे. भविष्यात या संकेतस्थळाला माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठीच्या आशय सामग्रीची एक सर्वसमावेशक बाजारपेठ आणि परस्पर संपर्काच्या केंद्राचे स्वरूप प्राप्त करून देणे हा सरकारचा मानस आहे. त्या दृष्टीनेच संकेतस्थळाला कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रोफाइलिंग म्हणजेच त्या त्या व्यक्तींची व्यावसायिक ओळख करून देण्याची तसेच मागणीनुसार जुळवणी करून देण्याच्या तंत्रज्ञानाचीही जोड दिली गेली आहे. या माध्यमातून ऑनलाइन संकल्पना मांडण्याचे सत्र, ऑनलाइन बीटूबी बैठका (विविध व्यावसायिक प्रतिनिधींच्या बैठका), वेबिनार या आणि अशाच प्रकारच्या इतर महत्त्वाच्या सत्रांचेही आयोजन केले जाणार आहे.




ही बाजारपेठ म्हणजे माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या अवकाशातील चित्रपट, दूरचित्रवाणी, ॲनिमेशन, गेमिंग, जाहिरात, वर्धित वास्तव (एक्स्टेंडेड रिॲलिटी), संगीत, ध्वनी संयोजन, नभोवाणी या आणि अशा विविध क्षेत्रांमधील भागधारकांना एकत्र आणणारे एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. हे व्यासपीठ विक्रेते आणि खरेदीदारांतील दुवा ठरेल आणि त्याद्वारे व्यावसायिकांना आपली कौशल्ये सुलभतेने सादर करण्याची, त्यांच्या संभाव्य ग्राहकांसोबत थेट संपर्क साधण्याची आणि उपयुक्त सहकार्यपूर्ण भागीदारीची संधी उपलब्ध करून देत राहील. एखादा चित्रपट दिग्दर्शक आपल्या चित्रपटासाठी निर्मिती भागीदाराच्या शोधात असेल, एखादा जाहिरातदार योग्य व्यासपीठाच्या शोधात असेल, एखादा गेम डेव्हलपर गुंतवणूकदाराच्या शोधात असेल किंवा एखादा कलाकार आपल्या कलाकृतींना जागतिक स्तरावरील प्रेक्षकांसमोर सादर करू इच्छित असेल, तर अशा सर्वांसाठी वेव्हज बाजारपेठेचा हा मंच म्हणजे परस्पर संपर्क, सहकार्य आणि व्यवसायवृद्धीचे बहुआयामी व्यासपीठ उपलब्ध करून देणारी मोठी जागा किंवा बाजारपेठ असणार आहे. एका अर्थाने वेव्हज बाजार ही एकप्रकारची समन्वित बीटूबी बैठकांची अभिनव बाजारपेठ आहे, जिने जागतिक मनोरंज क्षेत्रातील परस्पर संपर्क व्यवस्था, परस्पर सहकार्यपूर्ण भागीदारी व्यवस्था, आणि विकासाचा संपूर्ण चेहरामोहरा अगदी क्रांतिकारकरीत्या बदलला आहे. या बाजारपेठेने चित्रपट, दूरचित्रवाणी, संगीत, गेमिंग, ॲनिमेशन, जाहिरात तसेच वर्धित वास्तव (एक्स), आभासी वास्तव (व्हीआर) यांसारख्या जिवंत अनुभूती देणाऱ्या तंत्रज्ञानाशी संबंधित तज्ज्ञ व्यावसायिकांना एकत्र आणणारा मंच उपलब्ध करून दिला आहे. आणि याद्वारे विविध सर्जनशील क्षेत्रांसाठीच्या आशय सामग्रीचे सूचीकरण, त्याचा शोध आणि संबंधित व्यवहारांसाठीचाही एक व्यापक मंच उपलब्ध झाला आहे. चित्रपट वितरणासाठीचा मंचाच्या शोधात असलेले निर्माते, नव्या संकल्पना मांडू पाहणारे गेम डेव्हलपर किंवा लायसन्सिंग संधींच्या शोधात असलेले साऊंड डिझायनर अशा सगळ्यांसाठी वर्गवारीनुसार सूचीकरण, सुरक्षितपणे सादरीकरणे पाहण्याची दालने आणि संपर्क व्यवस्था उपलब्ध करून देत ही संपूर्ण प्रक्रिया सुलभ करणारी बाजारपेठ म्हणून वेव्हज बाजार उदयाला येणार आहे. या बाजारपेठेच्या माध्यमातून भौगोलिक मर्यादांच्या पलीकडे जात विक्रेते आणि खरेदीदारांना त्यांच्यासाठीचा योग्य भागीदार आणि संधी शोधण्याच्या दृष्टीने सक्षम करणाऱ्या सुविधांचा अंतर्भाव केला आहे. चित्रपट स्टुडिओ, ॲनिमेशन हाऊस, पॉडकास्ट निर्माते, मार्केटिंग यंत्रणा यांसारख्या विक्रेत्यांना आपल्या सेवा आणि त्यांच्याकडची आशय सामग्री जागतिक गुंतवणूकदार, वितरक आणि भागीदारांसमोर सादर करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

दुसरीकडे खरेदीदारांसाठीदेखील उच्च गुणवत्तेचे, आधुनिक काळाशी सुसंगत प्रकल्प या बाजारपेठेमुळे उपलब्ध होऊ लागले आहेत. त्याच वेळी गुंतवणूकदारांसाठीदेखील सहनिर्मितीच्या करारांची आणि व्यापक व्यावसायिक संधींची दारे खुली झाली आहेत. इथे आवर्जून उल्लेख करायला हवी अशी गोष्ट म्हणजे या व्यासपीठाला या उद्योग क्षेत्राशी संबंधित विशिष्ट उपक्रम, सादरीकरणे पाहण्याची दालने, गुंतवणूकदारांबरोबरच्या बैठका - चर्चा आणि कलाकृतींच्या थेट प्रक्षेपण सत्रांसारख्या लाइव्ह स्क्रीनिंगसारख्या उपक्रमांशी जोडले गेले आहे, यामुळे या व्यासपीठाच्या माध्यमातून केवळ आभासी संवादाच्या पलीकडे जात खऱ्या अर्थाने उपयुक्त असलेले करार आणि व्यवहार प्रत्यक्षात साकारले जातील याचीच सुनिश्चिती झाली आहे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे येत्या १ ते ४ मे २०२५ दरम्यान मुंबईत वांद्रे-कुर्ला संकुलात वेव्हज शिखर परिषद होणार असून त्यावेळी हा वेव्हज बाजारही साकारला जाणार आहे. यानिमित्ताने उपलब्ध करून दिलेल्या डिजिटल बाजारपेठेवर नोंदणी केलेल्या काही निवडक प्रतिनिधींना या बाजारपेठेत आपल्या संकल्पना मांडण्याची, या उद्योग क्षेत्रातील विविध घटकांसोबत संपर्क प्रस्थापित करण्याची, आघाडीच्या भागधारकांसोबत प्रत्यक्ष करार आणि व्यवहार पूर्णत्वाला नेण्याची मोठी संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. अभिनव दृष्टिकोनामुळे वेव्हज बाजार केवळ एक व्यासपीठ म्हणून मर्यादित राहिलेले नाही, तर ते अधिक स्मार्ट, परस्परांशी अधिक जोडलेले आणि जागतिक पातळीवरील सर्वसमावेशक मनोरंजन क्षेत्राच्या दिशेने सुरू झालेली चळवळच ठरले आहे.

एक कलाकार म्हणून, आम्ही कायमच आव्हानात्मक, प्रेरणादायी आणि चौकटीपलीकडे जाऊन विचार करायला लावणाऱ्या अवकाशाच्या शोधात असतो. वेव्हज हा अशाच प्रकारच्या अवकाशाच्या निर्मितीचा प्रयत्न आहे. दूरदृष्टीने सुरू केलेल्या या वाटचालीचा आपणही एक भाग असल्याचा मला खरोखरच अभिमान वाटतो. ही परिषद आपल्या परस्परांशी संपर्काच्या, कलाकृतींच्या निर्मितीच्या आणि मांडणीच्या पद्धतींमध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणेल. हा बदल केवळ भारतापुरता मर्यादित नसेल तर त्याचा प्रभाव अवघ्या जगात दिसेल. ही परिषद म्हणजे भारतासाठीचा 'लगान' क्षण आहे. जगभरातील माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी एकतेचा, धैर्याचा आणि एका अशा दृष्टिकोनाचा क्षण आहे, ज्याचा प्रतिध्वनी आपल्या सीमांच्याही पलीकडे ऐकू येत राहील.

**लेखक : आमिर खान, अभिनेता आणि निर्माते**

**(सौजन्य: पी आय बी, मुंबई)**

# अविस्मरणीय १० एप्रिल !

आम्हा सर्व सख्यांसाठी १० एप्रिल २०२५ हा दिवस आमचा आनंद द्विगुणित करणारा, अविस्मरणीय असा ठरला. सांगते, ते का म्हणून !

पहिले म्हणजे भिशी निमित्त गणरायांचे दर्शन होणार होते. तर दुसरे म्हणजे आमच्या सहलीची आयोजक नि व्यवस्थापक, आम्हा सर्वांची प्रिय सखी सौ. अलका भुजबळ हिची त्याच दिवशी दूरदर्शनच्या सह्याद्री चॅनलवर "हॅलो सखी" कार्यक्रमात थेट मुलाखत प्रसारित होणार होती. दोन्ही गोष्टींचा ताळमेळ कसा साधला जाईल, या विषयी आम्ही सख्या खरं तर चिंताच करीत होतो. पण अलका वर पूर्ण विश्वास असल्याने सर्व काही ठरल्या प्रमाणे होईल, असेही निश्चित वाटत होते आणि खरंच सर्व काही ठरविल्याप्रमाणे अलकाने सहलीचे नियोजन यशस्वीपणे केले.

सहलीला निघण्यापूर्वी आम्ही दुपारी बारा ते एक वाजेपर्यंत, अलकाची मुलाखत ऐकली व पाहिली. सह्याद्रीवर वाहिनीवर "हॅलो सखी" या कार्यक्रमात, बहुआयामी सखी या विषयावर प्रसारित झालेली तिची ही मुलाखत खूपच प्रेरणादायी होती. जाता – जाता खास स्त्रियांना तिने दिलेला मंत्र, "स्वत:चे आरोग्य जपा, आत्मविश्वासाने जगा आणि स्वत:साठी जगा." हा तर प्रत्येक महिलेने, मुलीने आचरणात आणला पाहिजे, असाच आहे.

आज आम्ही सर्व जणी एमटीएनएल मधून व्हीआरएस घेतल्यापासून स्वच्छंदी – मनमौजी जीवन जगत आहोत. हे दृश्य फक्त नवी मुंबईत प्रकर्षाने जाणवत आहे. याचे कारण म्हणजे जगण्याचा मंत्र देणारी नि अंमलात आणणारी अलका भुजबळ होय.

वाशीहून दुपारी अडीज वाजता पस्तीस जणीं साठी शिवनेरी बस निघाली. सानपाडा मार्गे प्रत्येक ग्रुप ला ठरलेल्या जागी घेत पनवेल पर्यंत, साऱ्यांना बसमध्ये घेऊन आम्ही ३५ जणी उरण जवळील चिरनेर येथे महागणपती चे दर्शनाला निघालो. तसा प्रवास लांबचा नव्हता. चार वाजता आम्ही चिरनेरला येऊन पोहोचलो. मंदिराबाहेरील प्रशस्त मोकळे पटांगण, नि भाविकांना दर्शनानंतर बसण्यासाठी भव्य असा मंडप ! बसण्यासाठी काही स्टीलच्या बाकांची सोय होती, तर जमिनीवर सतरंज्या टाकून बसण्याचीही सोय केली होती.

नंदीच्या पाठीवर हात फिरवत, वंदन करून रांगेत मंदिराच्या गाभाऱ्यात गेलो. लाल शेंदुराने रंगवलेली महागणपतीची मोठी मूर्ती, चमकणारे दिव्य ते नयन, पाहताच क्षणी बाप्पाच्या भक्तीत बुडावे, आम्ही सर्वजणींनी बाप्पाची मनोभावे आरती केली आणि सोबत आणलेला नैवेद्य बाप्पासमोर ठेवला. पेशवेकालीन महागणपती अतिशय मोहक मूर्ती डोळ्यात साठवून ठेवावी अशी.

उरणचा महागणपती समोर बसल्यानंतर तेथील पुजारी नितीन पाटील व न्यूज स्टोरी टुडे या वेब पोर्टलचे नियमित लेखक, वाचक श्री अनिल घरत यांची ओळख अलकाने करून दिली. त्यांनी या गणपतीची थोडक्यात माहिती दिली. ब्रिटिशांनी जंगलांवर हल्ला करून, नैसर्गिक संपत्तीची लूट करण्यास सुरुवात केली तेव्हा येथील पूर्वजांनी, त्यांना कसा विरोध केला, त्यावेळी काहीजण आपले प्राण गमावून अमर झाले. त्यांची साक्ष म्हणून ब्रिटिशांनी चालवलेली बंदुकीची गोळी ज्या ठिकाणी चाटून गेली, त्या जागी लाल रंगाची खूण दाखवून त्या संबंधीची माहिती दिली.

सर्वांचे दर्शन झाल्यावर आम्ही भक्त मंडपात भिशी फोडली. बाप्पा समोर भिशी ज्यांना लागली त्यांना अत्यंत आनंद झाला. जणू भिशी च्या रूपात बाप्पाने त्यांना प्रसाद दिला. तेथे एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे जिथे आम्ही बसलो असताना एक श्वान, अगदी गणपती समोर आमच्या शेजारी बसून होता. साऱ्यांचे निरीक्षण करत होता. हे जागृत देवस्थान आहे, त्यामुळे त्याची प्रचिती देत आहे असा भास झाला ! बाप्पांची आरती करून प्रसाद घेऊन, आम्ही आता केगाव च्या 'रिद्धी सिद्धी सिद्धिविनायक गणपती'ला निघालो.



*उरणचा महागणपती*

एक-दीड तासाच्या प्रवासानंतर आम्ही सिद्धिविनायक गणपती केगाव येथे पोहोचलो. तेथील रस्ते अरुंद असल्याने आम्हाला बस अगदी मंदिराजवळ नेता नाही आली. त्यामुळे थोडे चालण्यास मोकळीक मिळाली, बरे वाटले. मुख्यद्वारातून आत येताच, पायावर पाणी घेऊन, आम्ही मंदिराकडे वळलो. समोरच प्रशस्त मंदिराचा परिसर, खूप छान दिसत होता. चहुबाजूनी सेवाभावी लोकांसाठी केलेली सोय, एका खोलीतून कीर्तन-भजनाचा आस्वाद घेता आला. पटांगणात वृंदावन नि सभोवती मोकळे पटांगण, खूपच सुंदर ! तिथे आमची बचतगटाच्या सेवानिवृत्त प्राध्यापक सौ. माधुरी कुलकर्णी आणि वर्षा अधिकारी यांची भेट झाली.


त्यांच्या मुखातून, 'गणपती नवसाचा आहे.' आणि एकाच दगडात गणपती आणि त्याच्या बाजूला रिद्धी सिद्धी अशी ही एकमेव प्राचीन मूर्ती आहे, त्यांचे अनुभव ऐकले. त्यांच्या सासऱ्यांपासून गणपतीची सेवा केली जात आहे. ती त्यांच्या सुनेकडून पुढे चालू राहिली आहे. त्यांनी बचतगटाची निर्मिती करून, तेथील महिलांना एक उपजीविकेचे साधन उपलब्ध करून दिले आहे. पेशवेकालीन हा सिद्धिविनायक त्यांच्या दोन्ही बाजूस रिद्धी-सिद्धीच्या मूर्ती पाहवयास मिळाल्या. दुसरे म्हणजे मंदिर उद्ध्वस्त होऊ नये म्हणून देवळावर कळसाऐवजी मशिदीचा आकार दिला आहे, गणपतीमूर्तीच्या मागे शिलालेख कोरला आहे. या गोष्टी उल्लेखनीय वाटल्या.



केगावचा सिद्धिविनायक गणपतीचा प्रसाद उकडीचा मोदक ! खूपच अप्रतिम ! पाहुणचारात, बचत गटाच्या सौ वर्षा अधिकारी यांनी सर्वांना कांदेपोहे आणि त्यासोबत छान कैरीचे पन्हं, प्यायला दिले. तिथे जाणवलेली एक गोष्ट म्हणजे, एक वयस्कर स्त्री वांगी व चवळीच्या शेंगा पिशवीत घेऊन विकत होती. खूप जणांनी त्या विकतही घेतल्या. मंदिराच्या दारापर्यंत येऊन ती प्रेमाने घ्या असे सांगत होती, 'तुम्ही या आमच्या बरोबर खाऊन घ्या', असं म्हटलं तर म्हणाली 'नाही, तुम्ही प्या व खा. तुमचा हा पाहुणचार आहे. आम्ही रोजचेच आहोत." सेवेचा हा अनुभव गवसला. मंदिरातील संध्याकाळची आरती घेऊन सर्वांनी सिद्धिविनायकाचा प्रसाद घेतला व तिथून तेलपोळ्या, मोदक आणि काही जेवाणोपयोगी पदार्थ विकत घेऊन, आम्ही पुढच्या सफरीच्या वाटेवर निघालो.

अंधार झाला होता. रामबागची, उलवे येथे एक सफर बाकी होती. रामबाग उद्यानाची रात्रीची लायटिंग बघण्यासारखी असते, पण तेथे पोहोचेपर्यंत नऊ वाजून गेले होते. उद्यान बंद झाले होते त्यामुळे तिकडे गेलो नाही. पुढे वडाळे तलाव पनवेल येथे तलावाकाठी येऊन जेवण करावे, म्हणून तेथे थांबलो साधारण गर्दी होती. परंतु परिसर जेवण्यासाठी काही योग्य वाटला नाही, त्यामुळे जेवणाची पंगत गाडीतच बसून केली. केगाव येथून बचतगटाच्या वर्षा अधिकारी आणि माधुरी मॅडम ने दिलेले जेवण खूपच सात्विक होते. तिथून निघताना बराच उशीर झाला होता. येतानाचा मार्ग थोडा बदलला गेला. प्रत्येकीला शक्यतो घराजवळ सर्वांना सुखरूप उतरवण्याचे कार्य अलका पार पाडत होती.

सख्यांनो ! एकूण भिशी सोहळा खूप छान सजला. देवाच्या दारात भिशी ज्यांना लाभल्या, त्यांचे हार्दिक अभिनंदन-अभिनंदन- अभिनंदन ! पण मला जाणवलेली एक सुंदर कल्पना.... "सोळावं वरीस धोक्याचं असतं, तर साठावं वरीस स्वतःच असतं." तुम्हाला काय वाटतं ?




सौ वर्षा भावे,
नवी मुंबई. 9869484800

## लोकजागर

### लोक्सेवार्थ

पिडीत महिलांसाठी हकाक्चे माहेर

माहेर या संस्थेची स्थापना पुण्याजवळ असणाऱ्या वढू बुद्रुक येथे सिस्टर लुसी कुरियन यांनी १९९७साली त्याची स्थापना केली. त्याचा अनेक संस्था आहेत रांची, रत्नागिरी, एर्नाकुलम येथील दुर्गम भागामध्ये काम करतात. एक आंतरधर्मीय आणि जाती-मुक्त भारतीय गैर-सरकारी संस्था आहे. या संस्थेचे उद्दीष्ट निराधार महिला व बालकांसाठी आश्रय व मदत देणे हा आहे.१९९१ मध्ये, जेव्हा सिस्टर लुसी एच.ओ.पी.ई. संस्थेसाठी काम करत होत्या तेव्हा एक गर्भवती महिला त्यांना भेटायला व मदत मागायला आली. तिच्या पतीने दुसरी महिला घरी आणण्यासाठी तिला जिवे मारण्याचा प्रयत्न केला होता. सिस्टर लुसी तिला काही मदत करू शकली नाही, परंतु पुढील दिवसासाठी तिच्यासाठी काही प्रयत्न करून काहीतरी करण्याचे आश्वासन दिले. सिस्टर लुसी म्हणतात कि, मला एका सुरक्षित वातावरणात वाढवलं गेलं आणि मला माहित नव्हतं की एका रात्री एक स्त्रीच्या जीवनात इतका फरक पडू शकतो. मी खरोखरच एक तेजस्वी स्त्री पाहिली आणि तिच्या वेदना ऐकवल्या. आम्ही तिला हॉस्पिटलमध्ये नेले पण ती मरण पावली. आणि सात महिन्यांच्या गर्भस्त्रावधीचा मृत्यू झाला. या अनुषंगाने सिस्टर लुसी यांनी माहेरचा शोध लावण्याचा निर्णय घेतला, स्त्रियांना अशी दयनीय स्थितीत मदत करण्यासाठी आवश्यक पाठिंबा मिळण्यासाठी सात वर्षे लागली, परंतु २ फेब्रुवारी १९९७ रोजी पुण्याच्या बाहेरील वढू बुद्रुक गावात प्रथम माहेर घराचे दरवाजे उघडले. माहेर संस्थेची संथापक सिस्टर लुसी कुरियन ह्या आहेत. सिस्टर लुसी यांनी १ घर, ३ रहिवासी अशी अनिश्चित विषमतेपासून सुरुवात केली. आज माहेरचे डॉक्टर / सामाजिक कार्यकर्ते / शिक्षक / ट्रस्टीज / व्यवसायिक लोक / स्वयंसेवक इ.च्या प्रेमळ सैन्याने ४३ घरे संचालित केली आहेत. माहेर संस्थेमध्ये सध्या १२०० रहिवाशी आहेत. त्यातील ८६० मुले, ३०० महिलांसह १२० मानसिक आजार असलेल्या महिला आणि ७१ मानसिकरित्या वयस्कर पुरुष आहेत. तसेच स्वयं-मदत गट, ग्रंथालय वाचनालय इत्यादीसारखे समुदाय कार्यक्रमाद्वारे हजारो जण पोहोचले आहेत. धर्म, लिंग, जात, रंग, पंथ किंवा सामाजिक प्रतिष्ठा याकडे दुर्लक्ष करून माहेर संस्थेमध्ये सर्वांचे स्वागत आहे. माहेरमधील मुले रस्त्यावरून आणि झोपडपट्ट्यांतून येतात, समाजामध्ये भीक मागू नयेत, आईवडील त्यांना काळजी घेण्यास असमर्थ असतात, इतर संस्थांनी त्यांना नाकारले आहे. अशी मुले माहेर मध्ये अल्प किंवा दीर्घकालावधी साठी राहतात, आणि जोपर्यंत ते माहेरमध्ये राहतात तोपर्यंत त्यांचे शालेय शिक्षण, शिकवणी, उत्कृष्ट पोषण, ध्यान, कलात्मक प्रोग्रामिंग ई. सर्व गोष्टी त्यांना शिकवल्या जातात. ते शोकांतिकातून येतात आणि कुटुंब, प्रेम आणि उज्वल भवितव्य दर्शवितात.येथे आलेल्या स्त्रियांचा गोष्टी मुलांप्रमाणेच आहेत. कौटुंबिक हिंसाचार, अविवाहित गर्भधारणे, विधवा, हुंडा देय रक्कम आणि महिलांच्या समस्येचा सामना करण्यासाठी ग्रामीण भारताचे अपमानास्पद स्थान आहे आणि ही यादी पुढे चालू आहे. त्यावेळी अशा स्त्रिया बऱ्याचदा या परिस्थितीमध्ये स्त्रियांना वेश्याव्यवसाय किंवा आत्महत्येच्या पलीकडे कोणतेही पर्याय दिसत नाहीत. अशावेळी ह्या स्त्रिया माहेर मध्ये आश्रय घेण्यास येतात, माहेर मध्ये अशा सर्वांचे स्वागत आहे, माहेर मध्ये त्यांची काळजी घेतली जाते. प्रत्येक स्त्रीला वैयक्तिकरित्या समर्थन देण्यात येते, मग ते कुटुंबाबरोबर सलोख्याचे आणि पुनर्मंचन करून, नोकरी-प्रशिक्षण किंवा शालेय शिक्षण माध्यमातून स्वतःचा व्यवसाय असो किंवा माहेरच्या आत नोकरी. तथापि, काही जणांच्या भूतकाळातील मानसिक आजारामुळे फारच छान झाले आहे. अशा पुरुष आणि स्त्रियांना मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्या माहेरमध्ये दोन घरे आहेत, वैद्यकीय व मनोरंजक अशा लोकांची काळजी घेतात. समाजातील अत्याचाराने पिडीत,अबला महिलांना आधार देणाऱ्या माहेर संस्थेचे हे कार्य नक्कीच प्रेरणादाइ आहे.



### शून्यातून विश्व

परिस्थिती काहीही असो, वय कितीही असो, मात्र एखादी गोष्ट ठरवली की, आपण सर्व अडचणींवर मात करून यश प्राप्त करू शकतो.



यातच जर कुटुंब आणि घर सांभाळणाऱ्या महिला असतील आणि त्यांनी काहीतरी करण्याचं ठरवलं, तर त्या आपल्या जिद्दीच्या बळावर सगळ्या अडथळ्यांचे डोंगर पार करून यश मिळवतात. "नारी समाजस्य कुशलवास्तुकारा" या उक्तीप्रमाणे नारी ही समाजाची कुशल वास्तुकार आहे आणि आपली संस्कृती स्त्रीला देवी मानणारी आहे, आपल्या महिला आज कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत. यातीलच एक क्षेत्र आहे व्यवसाय क्षेत्र.याच व्यवसाय क्षेत्रात जिद्दीने उभ्या राहून आभाळा एवढ यश मिळवणाऱ्या चंद्रप्रभा यांची हि यशोगाथा. वयाच्या अशा टप्प्यावर, जेव्हा बहुतांश लोक निवृत्तीचा विचार करतात, 70 वर्षीय चंद्रप्रभा परिहार आज आपल्या व्यवसायात यशस्वीपणे पुढे वाटचाल करत आहेत. चंद्रप्रभा यांना प्रेमाने 'आबा' म्हटलं जातं. मुंबईत राहणाऱ्या आबांनी दीड वर्षांपूर्वी क्रोशिया कलेचा वापर करून बॅग्स, टोप्या, घरातील सजावटीच्या वस्तू आणि राख्या बनवायला सुरुवात केली आणि 'नेहर' या नावाने आपल्या ब्रँडची ओळख निर्माण केली.आबांनी आपल्या आयुष्यातील 70 वर्षे कुटुंबाची जबाबदारी पार पाडण्यात घालवली. त्यांना लहानपणापासूनच विणकामाची आवड होती, पण त्या कलेला व्यवसायात रूपांतर करण्याचा विचार त्यांनी कधीच केला नव्हता. त्यांनी 20 वर्षांपूर्वी या कलेत डिप्लोमा घेतला होता, पण कुटुंबाच्या गरजांमध्ये स्वतःचे स्वप्न साकार करण्याची संधी त्यांना कधी मिळाली नाही. मात्र, त्यांच्या सून स्वाती यांनी पाठिंबा दिल्यामुळे हे स्वप्न प्रत्यक्षात आणता आले.सुरुवातीला, सासु-सुनेच्या जोडीने हे फक्त छंद म्हणून हे सगळं सुरु सुरू केलं. स्वाती नवीन डिझाइन्स शोधून आबांना द्यायची आणि आबा त्या डिझाइन्स बनवून ओळखीच्या लोकांमध्ये वाटायच्या. व्यवसायाचा विचार तेव्हा सुरू झाला जेव्हा आबांच्या भाचीने त्यांच्या बनवलेल्या बॅग्स ऑफिसमध्ये नेल्या आणि सहकाऱ्यांनी अशाच बॅग्स बनवण्याची मागणी केली.या मागणीने त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि लवकरच त्यांना ऑस्ट्रेलियातून मोठं ऑर्डर मिळाली. यानंतर स्वातीने कंपनीची अधिकृत नोंदणी केली आणि वेबसाइट व इंस्टाग्राम पेज सुरू केले.आज आबा स्वतः प्रत्येक ऑर्डरवर काम करतात आणि एक यशस्वी उद्योजक म्हणून पुढे येत आहेत. तुम्हाला देखील आबांच्या या वस्तू खरेदी करायच्या असतील , तर त्यांच्या वेबसाइट www.nayher.com वर जाऊन त्यांच्या हातांनी बनवलेल्या वस्तू खरेदी करू शकता.

### शब्दार्थ

NCC या शब्दाचा इंग्रजी भाषेत Full Form हा National Cadet Corps हा आहे. NCC चा मराठी भाषेत Full Form हा नॅशनल कॅडेट कॉर्पस आहे. NCC ला मराठी भाषेत राष्ट्रीय विद्यार्थी सैनिक दल असे म्हणतात. आपल्याकडे NCC शब्दाला हिंदी भाषेत किंवा त्यांच्या पत्रव्यवहार भाषेत राष्ट्रीय सैनिक छात्र दल म्हणून ओळखले जाते.NCC महाविद्यालयात असताना आपल्याला सतत शिस्त आणि ध्येयाकडे लक्ष केंद्रित असणारे आर्मी सारखे राहणारे काही युवक दिसत असतात. महाविद्यालयात असताना देशसेवेसाठी एक प्रेरणा निर्माण करण्यासाठी आणि मुलांना आर्मीच्या शिस्तीसाठी तयार करायल NCC ला सुरुवात झाली.

**संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक सावळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# महाराष्ट्रामध्ये बटेंगे तो कटेंगे आणि बिहारमध्ये बाटेंगे तो जितेंगे : उद्धव ठाकरे

## शिवसेनेने हिंदुत्व कधीही सोडलेले नाही . भाजपला सोडले आह

## सगळे सोयीचे राजकारण हिंदुत्व आहे का? असा प्रश्न ठाकरे यांनी केला .

## महाराष्ट्रात आम्ही मराठी, मात्र राज्याबाहेर देशांमध्ये हिंदू, हे आमचे धोरण आहे

**मुंबई - वृत्तसंस्था**

नाशिक शहरातील मनोहर गार्डन लॉन्स येथे शिवसेना ठाकरे गटाचे एक दिवसीय विभागीय निर्धार शिबिर पार पडले. या शिबिराचे उद्घाटन पक्षाचे युवा नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांच्या हस्ते पार पडले. तर शिबिराचा समारोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंच्या भाषणाने झाला.

उद्धव ठाकरे म्हणाले की, “बाळासाहेबांनी माझ्यामागे तुमच्या सारखी पुण्याई उभी केली याचा मला अभिमान आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे खरे वारसदार आपण असून, महाराष्ट्रात दिशा आपण ठरवू कुणी गद्दार ठरवू शकत नाही. महाराष्ट्रात कुणाची मस्ती खपवून घेतली जाणार नाही. आमची मुंबई लुटली जात असून गुजरातला सगळं नेलं जात आहे, हे आम्ही सहन करणार नाही”, असे त्यांनी म्हटले.

नरेंद्र मोदी आले आणि त्यांनी अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम केला. त्यावेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असल्याने आम्हालाही वाटलं होतं की स्मारक होईल. मात्र, पुढे काहीच झाले नाही. त्यामुळे शिवरायांचे भव्य स्मारक राज्यपाल भावनाच्या जागेवर उभे करा. शिवाजी महाराजांपेक्षा मोठे कोणीच असू शकत नाही”, असेही उद्धव ठाकरे यांनी म्हटले

शिवसेनेने हिंदुत्व सोडलं अशी बोंब मारणाऱ्या भाजपला सांगतो की, मी तुम्हाला सोडले हिंदुत्व सोडलेले नाही. शिवसेना नसती तर तुम्ही आयोध्येपर्यंत पोहोचू शकले नसते. भाजपने बिहारमध्ये ‘सौगात ए मोदी’च्या माध्यमातून ३२ लाख मुस्लिमांना भेटीचे वाटप केले. त्यावेळी तुमचं हिंदुत्व कुठे गेले होते? म्हणजे महाराष्ट्रामध्ये बटेंगे तो कटेंगे आणि बिहारमध्ये बाटेंगे तो जितेंगे असे यांचे धोरण आहे. मी मुख्यमंत्री असताना कसलाही भेदभाव केला नाही. मी केलेल्या कामांमुळे मुस्लिम लोक माझ्यासोबत आले आणि हे घाबरले”, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी भाजपवर टीका केली.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाबद्दल स्पष्ट सांगितले आहे. शिवसेनेच्या दृष्टीने हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आहे. प्रत्येक नागरिक हा राष्ट्रभिमानी असला पाहिजे. आपल्या धर्म घरापुरता मर्यादित ठेवावा. घराच्या बाहेर पडल्यावर तो देशभिमानी असला पाहिजे. असे स्पष्ट हिंदुत्व आमचे आहे.



तमिळनाडूत यांनी मतांसाठी अन्नद्रमक पक्षाशी युती केली आहे. या पक्षाने हिंदुत्ववादाला प्रखर विरोध केला आहे. वक्फ निर्णयाला विरोध केला आहे. मग भाजप त्यांच्याबरोबर युती कसा करू शकतो? काश्मीरमध्ये मेहबूबा, आंध्र प्रदेशात चंद्रबाबू नायडू, बिहारमध्ये नितीश कुमार हे सगळे सोयीचे राजकारण हिंदुत्व आहे का? असा प्रश्न ठाकरे यांनी केला

# जिद्दी ...... सायली महादेव ठोंबरे



बीड ,अहिल्यानगर जिल्ह्याच्या सरहद्दीवर असलेलं, गर्भागिरी पर्वत रांगेच्या पायथ्याशी वसलेले एक टुमदार गाव, व ज्या गावाला ज्ञान पंढरी म्हणून ओळखले जाते, ते गाव म्हणजे देऊळगाव घाट तालुका आष्टी जिल्हा बीड होय. याच घाट देऊळगावत सायली चा जन्म झाला 17 जुलै 1997 रोजी झाला. सायलीचे वडील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी या संस्थेवर शिक्षक होते. एका सामान्य शिक्षकाच्या घरी जन्मलेली ती लहानपणापासूनच अभ्यासात हुशार, पण परिस्थिती साधी असल्यामुळे वडिलांच्या तत्त्वनिष्ठ शिक्षणाची तिला गोडी लागली. त्यामुळे शिक्षणाचे बाळकडू सायलीला घरातूनच भेटले. सायलीचे प्राथमिक शिक्षण, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावरगाव तालुका आष्टी जिल्हा बीड येथे झाले. पुढलं शिक्षण 5 वी व 6 वीचे शिक्षण श्री ज्ञानेश्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय देऊळगाव घाट येथे झाले. आवड असेल तर सवड आपोआप भेटत असते. त्याप्रमाणे सायलीला खेळाची आवड असल्यामुळे ,तिने तालुकास्तरीय रनिंग स्पर्धेत भाग घेतला, व तिची निवड तालुक्याला झाली ,पुढे जिल्ह्याला झाली, आणि पुढे राज्याचही नेतृत्व करण्याची संधी सायलीला भेटली. त्यामुळे तिचे पुढील शिक्षण विद्येचे माहेरघर असलेले पुणे तिथे सातवी ते दहावीचे शिक्षण, बालेवाडी येथे शिवछत्रपती क्रीडा विद्यालय बाणेर बालेवाडी येथे शासनाच्या कोठ्यातून पूर्ण झाले. तिला सलग तीन वर्षे पुढे रनिंग मध्ये गोल्ड मेडल भेटले. दहावी मध्ये ती शिवछत्रपती क्रीडा विद्यालयात बालेवाडी पुणे प्रथम क्रमांकाने पास झाली.पुढे अकरावी व बारावीचे शिक्षण रेसिडेन्सी विद्यालय अहिल्यानगर येथे तिने पूर्ण केले. व पुढे तिने मेकॅनिकल इंजिनीअरिंग चे शिक्षण डी वाय पाटील आकुर्डी पुणे येथे पूर्ण केले. त्यानंतर पुढे संपूर्ण जगाला स्तब्ध करणारा कोविड महामारीची लाट संपूर्ण जगावर आली. व त्याच काळात तिला अभ्यासाची गोडी लागली. सायलीने कोविडच्या काळामध्ये आपला अभ्यास जोमाने चालू केला. याच कोविड काळामध्ये 2020 साली RTO चा पेपर दिला. परंतु तिचा एक मार्गाने निकाल गेला. पण ती खचणारी सायली नव्हती .ती पुन्हा नव्या जिद्दीने अभ्यासाला सुरुवात केली. या सायलीच्या अभ्यासाचे साक्षीदार म्हणजे, विजेचा लुकलुकणारा दिवा, आणि मोडलेला टेबल.सायली म्हणजे वाऱ्याच्या झुळकी सारखी शांत, पण वादळासारखी जिद्दी... सायलीने ओळखलं कष्टाला विकल्प नसतो ,हे तिन्ही आयुष्याच्या प्रत्येक वळणावर सायली शिकली. आणि तिच्या आयुष्यातील तो सोनेरी दिवस उजाडला 2023 साली सोलापूर वनरक्षक मध्ये तिची अखेर निवड झाली. आणि तिने सोलापूर वनरक्षक नोकरी जॉईन केली .परंतु यावरही सायली थांबली नाही, तिने स्पर्धा परीक्षेचा अभ्यास चालू ठेवला. असं म्हणतात ना ,लहरो से डरकर नौका पार नही होती, कोशिश करने वाले की कभी हार नही होती. अखेर सायलीची निवड 4 मे 2024 रोजी आयटीआय प्राध्यापक पिका म्हणून नांदेड जिल्ह्यातील किनवट येथे तिची निवड झाली. ती आज आयटीआय प्राध्यापिका म्हणून रुजू झाली आहे. त्यामुळे तिचा मच्छिंद्रनाथ देवस्थान ट्रस्ट समिती, व आष्टी पाटोदा शिरूर विधानसभेचे आमदार सुरेश धस यांनी तिचे जंगी सत्कार केले. देऊळगाव घाट मधली पहिली आयटीआय प्राध्यापिका महिला म्हणून आज तिची इतिहासात नोंद झाली आहे.यावरून असे लक्षात येते की,शिकायला वय लागत नाही, आणि शिकवायला पदवी लागत नाही ,लागत असते ती फक्त जिद्द...... आज एका शिक्षकाची मुलगी आयटीआय प्राध्यापिका झाली आहे, कारण आज जिद्दी.... सायली एका वडिलांच्या स्वप्नाची गुरु पूर्णिमा ठरली आहे.......

**संकलन**

**.. पत्रकार आदिनाथ ठोंबरे,**

# खरे संस्कार

**मृत्युशय्येवर अखेरच्या घटका मोजीत असलेल्या टॉम स्मिथने आपल्या मुलांना आपल्याजवळ बोलावून घेतले आणि तो त्यांना म्हणाला, "बाळांनो, मी आज या जगाचा निरोप घेत आहे,**

**परंतु जातांना मला तुम्हा मुलांना एव्हढंच सांगायचं आहे की मी आज पर्यंत जसं सरळमार्गी आयुष्य जगलो तसंच जीवन जर तुम्हीही जगाल तर मला जी मनःशांती लाभली ती तुम्हालाही लाभेल."**

त्याची मुलगी सारा म्हणाली, "बाबा, आमचं हे दुर्दैव आहे की तुम्ही हे जग सोडून जातांना तुमचं बँक खातं हे पूर्णपणे रितं झालेलं आहे. आमच्यासाठी तुम्ही कांहीच पैसा शिल्लक ठेवला नाहीत. ज्यांचा तुम्ही भ्रष्ट, सरकारी पैसा चोरणारे चोर, अशा शेलक्या शिव्यांनी उद्धार केलात, अशा सर्व लोकांनी आपल्या मुलाबाळांसाठी आपल्या मागे भरपूर संपत्ती मागे ठेवली आहे. आपलं तर हे घरसुद्धा आपल्या मालकीचं नसून भाड्याचं आहे. निदान मी तरी तुम्ही दाखवलेल्या आदर्श मार्गावरून चालणार नाही. आम्हाला आमचा मार्ग निवडू द्या." थोड्याच वेळात स्मिथने आपला अखेरचा श्वास घेतला आणि त्याचा देह निष्प्राण होऊन पडला.

तीन वर्षांनंतर सारा एका बहुराष्ट्रीय कंपनीत नोकरी करण्यासाठी मुलाखत द्यायला गेली.. मुलाखतीदरम्यान तिला मुलाखतकाराने विचारलं, "तुझं आडनांव काय म्हणालीस? स्मिथ ? कुठली बरं ही स्मिथ.....?

यावर सारा म्हणाली, "मी सारा स्मिथ. माझे वडील टॉम स्मिथ. ते आता हयात नाहीत."

मुलाखत घेणाऱ्या पॅनेलच्या अध्यक्षाने जरा अविश्वासाच्या सुरातच विचारलं, "ओहो, तू टॉम स्मिथची मुलगी आहेस? " पॅनेलमधील इतर सदस्यांकडे एकवार नजर टाकून तो म्हणाला, "हा स्मिथ नांवाचा मनुष्य तोच आहे बरं कां ज्याने ' Institute of Administrators ' या संस्थेमध्ये माझ्या सभासदत्वाच्या अर्जावर स्वाक्षरी केली होती आणि आज त्याच्याच शिफारशींमुळे मी आज या पदापर्यंत पोहोचू शकलो. त्याने हे माझ्यासाठी अगदी निरपेक्षपणे, कसलाही मोबदला न घेता केलं. मला तर त्यांचा पत्ताही माहित नव्हता. त्यांची माझ्याशी कसलीही ओळख नव्हती, पण तरीही हे त्यांनी केवळ माझ्या हितासाठी केलं..."

इतकं बोलून तो साराकडे वळून म्हणाला, "मला तुला आता कुठलाच प्रश्न विचारायचा नाहीये. तुला ही नोकरी मिळालीच आहे असं समज. उद्या येऊन तुझं नियुक्ती पत्र या कार्यालयातून घेऊन जा..." सारा स्मिथ कॉर्पोरेट अफेअर्स मॅनेजर म्हणून कंपनीत नियुक्त झाली. तिच्या दिमतीला ड्रायव्हर सहित दोन कार्स, कार्यालयाला लागूनच असलेला एक डुप्लेक्स बंगला आणि दरमहा एक लाख पौंडांचा पगार आणि याशिवाय इतर भत्ते आणि खर्च इत्यादी मिळू लागलं.

नोकरीत दोन वर्षे पूर्ण झाल्यानंतर कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर अमेरिकेतून आपल्या देशात परतले आणि त्यांनी आपली निवृत्ती घोषित केली. त्यांच्या जागी नवी नियुक्ती करणं आवश्यक होतं. या जागेसाठी अतिशय विश्वसनीय मनुष्याची आवश्यकता होती. आणि या जागेसाठी कंपनीच्या सल्लागारांनी पुन्हा एकदा सारा स्मिथच्याच नांवाला पसंती दिली.

एका मुलाखतकाराला दिलेल्या इंटरव्ह्यूमध्ये तिला जेव्हा नोकरीतील तिच्या यशाचं गुपित विचारल्या गेलं तेव्हा अश्रू भरल्या नेत्रांनी ती उत्तरली, "माझ्या वडिलांनीच माझ्या यशाचा मार्ग मला आखून दिला होता. ते जेव्हा स्वर्गवासी झाले तेव्हा मला कळलं की सांपत्तिक दृष्ट्या जरी ते गरीब होते तरी सचोटी, शिस्त आणि प्रामाणिकपणा या गुणांनी ते खूप खूप श्रीमंत होते.

"आता इतक्या वर्षांनी वडिलांच्या आठवणींनी रडण्याइतक्या आपण लहान नसूनही आपल्या डोळ्यांत त्यांच्या आठवणींमुळे पाणी कां येते?" या, मुलाखतकाराच्या प्रश्नावर त्या उत्तरल्या, "माझ्या वडिलांच्या मृत्यूसमयी मी त्यांना ते आयुष्यभर सचोटीच्या मार्गाने चालले या गोष्टीसाठी अपमानास्पद बोलले होते. आज मी त्यासाठी त्यांची क्षमा मागतेय. ते मला त्यांच्या थडग्यातून ऊठून निश्चितच माफ करतील अशी मला आशा आहे. मी आज या पदावर




पोहोचले ते केवळ त्यांच्या पुण्याईमुळे. यात माझं श्रेय काडीचंही नाही."

मग शेवटी तिला आणखी एक प्रश्न विचारण्यात आला. "मग आपण आपल्या वडिलांनी जो मार्ग आपल्याला आखून दिला आहे त्याच मार्गाचं अनुसरण कराल कां?"

यावर त्या म्हणाल्या, "मी आता माझ्या वडिलांना खूप मानते. त्यांचं एक भव्य तैलचित्र मी माझ्या दीवाणखान्यात प्रवेशदारासमोरच लावून ठेवलंय. माझ्यापाशी आज जे कांही आहे त्याचं श्रेय भगवंताच्या खालोखाल मी माझ्या वडिलांनाच देते."

आपणही टॉम स्मिथसारखेच आहोत कां..?

किर्तीरूपाने शिल्लक राहता येऊ शकते. किर्ती पसरायला आणि किर्तीरूपाने जीवंत होण्यासाठी वेळ लागतो जरूर, पण त्या रूपाने माणूस अमर होऊन जातो..

सचोटी, शिस्त, स्वतःवर ताबा ठेवणं आणि परमेश्वर आपल्याकडे पाहतोय याची सदोदित जाणिव हे गुणच माणसाचं खरं धन आहे, बँक खात्यातील अमाप पैसा नव्हे. आपल्या मुलाबाळांसाठी हाच वारसा ठेवावा. चांगल्या वागणुकीचे आर्थिक मूल्य नसले तरी, चांगल्या वागणुकीत कोट्यावधींची मने जिंकण्याची शक्ती असते याची जाणीव सदैव मनी असू द्या...

***आपणही या परिवर्तनाचे अग्रदूत बनू या...***
***आपल्याला आयुष्यात जे काही मिळाले ते पचवायला शिका...***
***कारण भोजन जर पचले नाही तर रोग वाढतात...***
***पैसा पचला नाही तर देखावा वाढतो...***
***बातचीत पचली नाही तर चुगली वाढते...***
***प्रशंशा पचली नाही तर अहंकार वाढतो...***

***टिका पचली नाही तर दुश्मनी वाढते...***
***गोपनीयता टिकली नाही तर खतरा वाढतो...***
***दुःख पचले नाही तर निराशा वाढते...***
***आणि सुख पचले नाही तर पाप वाढते...***

संयम हा यश मिळविण्यासाठी लागणारा सर्वात मोठा घटक आहे. समोर अंधार असला, तरी त्याच्या पलीकडे प्रकाश आहे हे लक्षात ठेवा. शिक्षण, डिग्री, पैसा यावरून माणूस कधीच श्रेष्ठ किंवा मोठा होत नसतो. कष्ट, अनुभव व माणुसकी हेच माणसाचं श्रेष्ठत्व ठरवते. माणसाकडे कपडे स्वच्छ असो वा नसो पण मन मात्र स्वच्छ असलं पाहिजे. कारण स्वच्छ कपडयाचीं स्तुति लोक करतात आणी स्वच्छ मनाची स्तुति परमेश्वर करतो. तर चला आपणही आपल्या आचरणांने व वागण्यांने परमेश्वराचे स्तुती योग्य होवू या.

**माहिती संकलन - पत्रकार सोपान पगारे**

# शेतरस्त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी "सस्ती अदालत" उपक्रम राबविणार : विभागीय आयुक्त दिलीप गावडे

**छत्रपती संभाजीनगर**

शेतकरी बांधवांसाठी आपल्या शेतात जाण्यायेण्यासाठी शेतरस्ता, पाणंद रस्ता अत्यंत महत्वाचे असतात. गाव नकाशाप्रमाणे अतिक्रमित व बंद झालेले शेत रस्ते, पाणंद रस्ते मोकळे करुन देण्यासाठी तालुका पातळीवर सस्ती अदालत उपक्रम राबविण्याचे निर्देश आज विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी दिले. शेतकरी बांधवांनी शेतरस्ते मोकळे देण्यासाठीच्या या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा असे आवाहनही त्यांनी केले.

मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातील नागरिक आपल्या शेतातील जाण्या-येण्याच्या रस्त्याबाबत अडचणी घेऊन विभागीय आयुक्त कार्यालयात प्रशासकीय अधिकारी यांच्या भेटीसाठी, निवेदने देण्यासाठी येतात. मात्र विभागीय पातळीवरील अधिकारी अनेकदा कामानिमित्त दौऱ्यावर किंवा अन्य कामामुळे त्यांची भेट होत नाही, हीच बाब विचारात घेत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी शेतकऱ्यांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधण्यासाठीचा उपक्रम हाती घेतला आहे. आज शेतरस्ते शिव रस्ते, पाणंद रस्ते याबाबत विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी संवाद साधला. यावेळी अपर आयुक्त बाबासाहेब बेलदार, अपर आयुक्त के.आर.परदेशी, उपजिल्हाधिकारी उमाकांत पारधी, उपजिल्हाधिकारी शुभांगी आंधळे यांच्यासह संबंधित निवासी उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री.गावडे म्हणाले, जे रस्ते अस्तित्वात आहेत त्यांना क्रमांक देण्यात यावेत. शेतजमिनीमध्ये वहिवाट करण्यासाठी अस्तित्वात असलेले रस्ते काही ठिकाणी अरुंद आहेत. अशा ठिकाणी मोठी वाहने जाण्यास अडचण निर्माण होऊन तक्रारही होतात. सर्वच शिवपाणंद आणि शेतरस्त्यांची हद्द निश्चित करून त्यांची कामे दर्जेदाररीत्या पूर्ण करावी, शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर महसूल प्रशासनामार्फत योग्य ती कार्यवाही करावी, शेत वहिवाट रस्त्याची तक्रार सुनावणी तहसीलदार यांच्याकडे होते. अशी रस्त्यांबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे एका महिन्यात निकाली काढावीत. असे स्पष्ट आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यांनी यापूर्वीच दिले आहेत.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेणे, त्यांचे निराकरण करण्यासाठी विभागातील सर्व निवासी उप जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांशी या वेबिनारच्या माध्यमातून चर्चा आणि अडचणीचे निराकरण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. संभाजीनगर जिल्ह्यातील ईसारवाडी ता.पैठण येथील शेतकऱ्यांनी शेतरस्त्याबाबत आपली अडचण मांडली. विशाल घुले यांनीही पाणंद रस्त्याची समस्या बोलून दाखविली. वायगाव



ता.पैठण येथील बबन बोबडे यांनी शेतरस्त्यासाठी प्रशासनाने मदत करावी अशी अपेक्षा व्यक्त केली. वैजापूर तालुक्यातून विपीन काळे यांनी गावात गावनकाशा ठळक स्वरुपात लावला तर गावातील शेतरस्ते मोकळे होण्यास मदत होईल, तसेच गट मोजणी करून हद्द निश्चित करावी अशी मागणी केली. याबाबत विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी श्री.काळे यांनी मांडलेली कल्पना निश्चितपणे चांगली असल्याचा उल्लेख केला. यामुळे शेतरस्ते, पाणंद रस्ते मोकळे होतील, संबंधित तालुका प्रशासनाने याबाबत कार्यवाही करावी तसेच नवीन रस्ते गाव नकाशात समाविष्ठ करण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवावा, विभागीय आयुक्त कार्यालयाकडून धोरणात्मक निर्णयासाठी राज्याच्या जमाबंदी विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल असेही श्री.गावडे म्हणाले.

लातूर जिल्ह्यातून रामेश्वर शेटे, सुदर्शन पाटील, बळीराम पाटील, एकनाथ पांढरे यांनी शेतरस्त्याच्या अडचणी मांडल्या. याबाबत जिल्हा प्रशासनाने मोहिम स्वरुपात कालबद्ध कार्यक्रम राबवावा तसेच तालुका पातळीवर सस्ती अदालत उपक्रमाचे तातडीने नियोजन करावे. असे निर्देश विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी दिले. नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथून भारत परबते यांनी पाणंद रस्ते, अतिक्रमणाबाबत आपली अडचण सांगितली. तसेच इतर शेतकऱ्यांनीही शेतरस्त्याबाबतच्या आपल्या अडचणी विषद केल्या.

हिंगोली जिल्ह्यातील अविनाश नरवडे यांनी शेतरस्ते अतिक्रमणाचा विषय सांगितला. याबाबत गरज तपासून पोलीस बंदोबस्तात रस्ता मोकळा करावा असे निर्देश दिले. विनोद राठोड यांनी पिंपळवंडी रस्त्याचा प्रश्न मांडला. त्यांच्यासह जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी चर्चेत सहभाग घेतला.

**“संवाद मराठवाड्याशी” उपक्रमांतर्गत विभागीय आयुक्तांचा थेट शेतकऱ्यांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे संवाद**

**शिव रस्ते, पाणंद रस्ते याबाबत आठही जिल्हयातील शेतकऱ्यांनी मांडल्या अडचणी**

**तालुका पातळीवर दर पंधरवाड्याला सस्ती अदालत घेण्याचे निर्देश**

जालना जिल्ह्यातील बदनापूर येथून लक्ष्मण कुऱ्हाडे यांनी चर्चेत सहभाग घेतला. आमच्या गावात पाणंद रस्ते नाहीत, गेल्या अनेक वर्षांपासून आमचा यासाठी प्रयत्न सुरू आहे. शेतात जाण्यायेण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. श्री.कुऱ्हाडे यांच्या अडचणीबाबत विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी जालना जिल्हा प्रशासनाने हा विषय मार्गी लावून यासोबतच इतर शेतकरी बांधवांचाही प्रश्न मार्गी लावण्यासाठी तातडीने सस्ती अदालतीचे आयोजन करावे असे निर्देश दिले. बीड जिल्ह्यातील शिरुर कासार, गेवराई येथील शेतकरी बांधवांनी आपल्या शेतरस्त्यांसंदर्भातील अडचणी मांडल्या. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी श्री.स्वामी यांनी शेत रस्ते मोकळे करण्यासाठी बीड जिल्हा प्रशासनाने केलेल्या नियोजनाबाबत माहिती दिली. धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर, उमरगा येथून शेतकऱ्यांनी चर्चेत सहभाग घेतला. परभणी जिल्ह्यातूनही अनेक शेतकऱ्यांनी शेतरस्ते, पाणंद रस्ते याबाबतच्या समस्या मांडल्या. याबाबत लवकरच सस्ती अदालत उपक्रम हाती घेणार असल्याचे जिल्हा प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले. शेतरस्ते, पाणंद रस्ते बाबतच्या या संवादात मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यातून संवाद साधण्यासाठी मोठ्या संख्येने शेतकरी चर्चेत सहभागी झाले होते. विभागीय पातळीवरुन ज्या शेतकऱ्यांशी आज संवाद होऊ शकला नाही त्या शेतकरी बांधवांशी संबंधित जिल्हा, तालुका प्रशासनाने सस्ती अदालतीच्या माध्यमातून संवाद साधून त्यांचे शेत रस्त्यांचे प्रश्न तत्परतेने मार्गी लावावेत असे निर्देश विभागीय आयुक्त श्री. गावडे यांनी दिले. अपर आयुक्त बाबासाहेब बेलदार यांनी शेतरस्ते व त्याबाबतच्या कायद्याबाबत माहिती दिली. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील जिल्हा व तालुका प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांनी या संवाद कार्यक्रमात सहभाग घेतला.

# या देशाला बाबासाहेबांच्या विचारांची गरज : मुख्य अभियंता सुनिल इंगळे

## देशाचा नवा इतिहास बाबासाहेबांनी लिहिला : अफसर शेख

**परळी: भगवान साकसमुद्रे**

या देशाला महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची नितांत गरज आहे आणि सर्व जाती धर्माच्या लोकांनी एकत्र येऊन त्यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली पाहिजे.असे प्रतिपादन परळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता सुनिल इंगळे यांनी केले.ते परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या प्रशासकीय इमारतीत आयोजित केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी विचारमंचावर प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार, अधीक्षक अभियंता राजीव रेड्डी, अधीक्षक अभियंता धनंजय कोकाटे, सचिन पेटकर, सुरेश गर्जे, वरिष्ठ व्यवस्थापक बी. आर. अंबाड, कल्याण अधिकारी शरद राठोड , कार्यकारी अभियंता सुमित गायकवाड, मदन पवार, श्रीकांत इंगळे, नंदकुमार आंधळे, संजय उधार,अरुण गित्ते उपस्थित होते.






यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बारामतीचे अफसर शेख यांनी 'महापुरुषांचे विचार व सद्यस्थिती' या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, आज आपल्याला आपल्या आजोबा, पणजोबा यांच्या नंतरच्या पिढीतील लोकांची नावे आठवत नाहीत, परंतु विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव जगभर घेतले जाते आणि त्यांचा आदर्श मानला जातो. यामागे त्यांचे मोठे कार्य आहे. या देशाचा नवा इतिहास बाबासाहेबांनी लिहिला आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.कामगार नेते हरीराम गित्ते यांनी सांगितले की, बाबासाहेबांनी भारतातल्या प्रत्येक माणसाला माणूसपण देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. महात्मा जोतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२५ च्या वतीने आयोजित विविध स्पर्धा कार्यक्रमांचे बक्षीस वितरण यावेळी करण्यात आले. रांगोळी स्पर्धेतील विजेत्यांना सौ. अनिता सुनिल इंगळे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

माजी सैनिक मेस्कोचे कॅप्टन गौतम गायकवाड यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात मुख्य अभियंता सुनिल इंगळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आनंद तूपसमुद्रे यांनी सामूहिक त्रिशरण- पंचशील ग्रहण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपकार्यकारी अभियंता शिवाजी होटकर यांनी केले, तर सूत्रसंचालन हिमानी इंगळे यांनी केले आणि उपस्थितांचे आभार जयवर्धने सूर्यवंशी यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्याध्यक्ष महेंद्र रोडे, मागासवर्गीय संघटनेचे नेते बी. एल. वडमारे, रवी भालेराव, संघरक्षित मस्के, लक्ष्मण शिंदे, संदीप गायकवाड, राजू गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

# परळीत एक वही एक पेन अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद

## माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी दिली भेट

**परळी प्रतिनिधी**

महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत एक वही एक पेन हे अभियान परळी शहरात बाबासाहेबांच्या जयंती दिनी राबविण्यात आले. या अभियानास महाराष्ट्राचे माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी भेट दिली तसेच यावेळी त्यांनी या अभियानाचे कौतुक केले व त्यांच्या हस्ते चिमुकल्यांना वही,पेनचे वाटप करण्यात आले.

रेल्वे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात युवा कार्यकर्ते विकास रोडे व पत्रकार विकास वाघमारे यांच्या संकल्पनेतून एक वही एक पेन अभियानाचे उद्घाटन इंटक चे युवक प्रदेश अध्यक्ष दत्तात्रय गुट्टे, रेल्वे पोलीस निरीक्षक बी.एस.कांबळे तर अध्यक्ष स्थानी मुफ्टाचे जिल्हा अध्यक्ष भैय्यासाहेब आदोडे होते.प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध विचारवंत अजयकुमार गंडले,लेखक, दिग्दर्शक प्रा.डॉ. सिद्धार्थ तायडे, जेष्ठ पत्रकार व साहित्यिक भीमयुगकार रानबा गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलराव झिलमेवाड, संपादक अनिल सावंत, पृथ्वी शिंदे,पत्रकार संभाजी मुंडे, पत्रकार दत्ता काळे,सुजीत कांबळे, पत्रकार ओमप्रकाश बुरांडे, पत्रकार धीरज जंगले, अनंत कुलकर्णी,पत्रकार महादेव शिंदे, पत्रकार विजय रोडे,वसंतोष कोदरकर,डोंबे मामा, शिवाजीराव बनसोडे आदी उपस्थित होते.

या अभियानास माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या सह रिपाईचे राज्य सचिव भास्कर नाना रोडे,भाजपाचे शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, जिल्हा परिषदेचे गट नेते अजय मुंडे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे,प्रा . दासू वाघमारे,सामाजिक कार्यकर्ते डॉ.विनोद जगतकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके,सिराजभाई,अनंत इंगळे,रवी मुळे, महेंद्र रोडे,भीमराव डावरे,प्रा.विलास रोडे, सुभाष वाघमारे,विलास ताटे , अँड. दिलीप उजगरे,लक्ष्मण वैराळ सर,मारोती वाघमारे आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विकास रोडे, पत्रकार विकास वाघमारे, प्रशांत रोडे, गौतम रोडे,नवनाथ दाने, विद्याधर सिरसाठ,आकाश देवरे, पत्रकार खांडेकर आदिंनी परिश्रम घेतले.



# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची परळीत महत्त्वपूर्ण बैठक

## खा .बजरंग बाप्पा सोनवणे व राजेंद्र मस्के यांची उपस्थिती ; पदाधिकारी कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने परळी विधानसभा मतदारसंघाचा आढावा, पक्षाच्या विविध आघाडीवरील पदाधिकाऱ्यांच्या निवडी तथा कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याच्या अनुषंगाने शनिवार दिनांक 19 एप्रिल 2024 रोजी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राजेभाऊ फड यांच्या जनसंपर्क कार्यालयात ही बैठक सकाळी 11 वाजता संपन्न होणार आहे. या बैठकीस बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे तसेच पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह मान्यवर नेतेमंडळींची उपस्थिती असणार आहे.





राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या परळी विधानसभा मतदारसंघातील सर्व सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच पक्षावर निष्ठा ठेवणाऱ्या सर्वांची महत्त्वपूर्ण बैठक शनिवार दिनांक 19 एप्रिल 2025 रोजी आयोजित करण्यात आली आहे. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे तसेच पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या उपस्थितीत सकाळी 11 वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राजेभाऊ फड यांच्या जनसंपर्क कार्यालयात ही बैठक संपन्न होणार आहे. या बैठकीत मतदारसंघातील विविध महत्त्वपूर्ण मुद्यांवर चर्चा केली जाणार असून, पक्षाच्या नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यासाठी पक्षाचे सर्व मार्गदर्शक नेतेमंडळी आढावा घेणार आहेत. या बैठकीस परळी विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी उपस्थित रहावे असे आवाहन पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्यासह उत्तम दादा माने, मिनिनाथ दादा फड, देवराव महाराज लुगडे, बाबासाहेब शिंदे, जीवनराव देशमुख, एच.यू.फड, शंकर शेजुळ, वर्षाताई रायभोळे, कल्पनाताई देशमुख, रमेश ढाकणे, सोमनाथ भोसले, फिरोज सय्यद, कल्पनाताई देशमुख, मंगलताई सोळंके, अश्विनीताई सोळंके, दीपाली सावंत, अश्विनी सरवदे, हनुमंत फड, डॉ.जे. एन.शेख, गणेश देवकते, भीमराव हाके, प्रकाश राठोड, राजेश फड, शिवाजीराव नागरगोजे, पप्पू गित्ते, समाधान मुंडे, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले आहे.

# २२ एप्रिलला ना. पंकजाताई मुंडेंच्या जनता दरबाराने होणार सुरवात

**मुंबई वृत्तसंस्था**

प्रदेश भाजपच्या वतीने प्रत्येक महिन्याला जनता दरबार घेण्यात येणार आहे. भाजपचे सर्व मंत्री प्रदेश कार्यालयात येऊन जनता दरबार घेणार असून पहिला जनता दरबार घेण्याचा मान येत्या २२ एप्रिल रोजी राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांना मिळाला आहे. पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी यावेळी उपस्थित राहावे असे आवाहन पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रदेश भाजपाकडून दर महिन्याला एक दिवस प्रत्येक मंत्रीमहोदयांचा 'जनता दरबार' आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. याचा पहिला मान राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना.



पंकजाताई मुंडे यांना देण्यात आला आहे. येत्या मंगळवारी म्हणजे २२ एप्रिल रोजी दुपारी ३ ते ४.३० या दरम्यान भाजपा प्रदेश कार्यालय, मुंबई येथे त्या जनता दरबार घेणार आहेत. या अनुषंगाने त्या त्या जिल्ह्यातील व भागातील संबंधित मंत्रीमहोदयांच्या विभागांतर्गत येणाऱ्या अडचणी सोडविण्याकरिता आपल्या भागातील कार्यकर्त्यांनी लेखी निवेदनाच्या दोन प्रती घेऊन २२ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता प्रदेश कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित रहावे, शक्य असल्यास कार्यकर्त्यांनी एक आगाऊ निवेदनाची प्रत bjpmaha@gmail.com या ईमेल आयडीवर पाठविल्यास त्यावर लवकरात लवकर कार्यवाही करणे व ती प्रत त्या विभागाकडे पाठविणे सोयीचे होईल असे प्रदेश कार्यालयाने म्हटले आहे. या जनता दरबारचा राज्यातील सर्व कार्यकर्त्यांनी लाभ घ्यावा. प्रत्यक्ष उपस्थित राहून मंत्री महोदयांकडून आपल्या भागातील विकासाची कामे मार्गी लावण्याच्या दृष्टीने जनता दरबारची आपणास मदत होईल, असा विश्वास भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केला आहे.

# भारत मातेच्या सेवेसाठी 17 वर्षे समर्पित सेवा केल्यानंतर रंजीत तिडके यांचा सत्कार

**परळी वैजनाथ (ता. परळी)**

रंजीत हरिश्चंद्र तिडके यांनी तब्बल 17 वर्षे भारतीय सेनेत सेवा बजावून सुखरूप परत आल्यानंतर त्यांच्या गौरवाचा क्षण साजरा करण्यात आला. त्यांच्या या उल्लेखनीय सेवेबद्दल मराठवाडा बहुउद्देशीय ग्रामीण विकास सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते श्री. वैजनाथ चाटे सर यांनी विशेष सत्काराचे आयोजन केले.

या सत्कार समारंभास बालाजी माध्यमिक विद्यालय, सेलू परळीचे मुख्याध्यापक श्री. नामदेव मुंडे तसेच गणेश प्राथमिक विद्यालय परळी वैजनाथ आणि बालाजी माध्यमिक विद्यालय, सेलू परळी येथील शिक्षक उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी रंजीत तिडके यांची भारत मातेप्रती असलेली निष्ठा आणि त्यांची देशसेवा गौरवपूर्वक स्मरली.



सत्कार प्रसंगी तिडके यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमामुळे युवकांमध्ये देशसेवेबद्दलची प्रेरणा वाढेल, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# डॉ .बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधत स्तंभलेखक उत्तम बोडखे यांचा गौरव !

**आष्टी (प्रतिनिधी)**

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने आष्टी येथील अनिलभैय्या नगर भागामध्ये अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणात स्तंभ लेखक तथा दैनिक झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे यांचा मान्यवरांच्या हस्ते आज गौरव करण्यात आला.विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने आष्टी येथील जेष्ठ पत्रकार तथा स्तंभलेखक उत्तम बोडखे यांचे आजपर्यंतचे कार्य कौतुकास्पद असून राजकीय,सामाजिक, धार्मिक, वैचारिक आदि क्षेत्रामध्ये मार्गदर्शन करणारे आहे.त्याची दखल



घेत या वैविध्यपूर्ण स्तंभालेखनाबद्दल आष्टी येथील अनिलभैय्या नगरामध्ये संपन्न झालेल्या भीमजयंती कार्यक्रमात भाजप अनुसूचित जाती सेलचे प्रदेश उपाध्यक्ष अॅड.वाल्मीकतात्या निकाळजे,सुप्रसिद्ध कवी प्रा. सय्यद अल्लाउद्दीन, विधीज्ञ रत्नदीप निकाळजे आदि सह मान्यवरांच्या हस्ते उत्तम बोडखे यांचा शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ आणि सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.दरम्यान उत्तम बोडखे यांनी आजपर्यंतच्या कारकीर्दीत पत्रकारितेच्या माध्यमातून जनसामान्यांचा आवाज बुलंद करण्याचे काम केले असे सांगून बोडखे यांचे सातत्यपूर्ण लिखाण आष्टीकरांना योग्य दिशा देणारे आहे अशा शब्दात भाजप अनुसूचित जातीचे प्रदेश उपाध्यक्ष अॅड.वाल्मीकतात्या निकाळजे यांनी त्यांचा गौरव केला.प्रसिद्ध कवी सय्यद अल्लाउद्दीन यांनी उत्तम बोडखे यांची पत्रकारिता सकारात्मक असून गुणवंतांना न्याय देण्याचे काम करते असे सांगितले.अॅड. रत्नदीप निकाळजे यांनी उत्तम बोडखे यांचा लेखणी सम्राट असा उल्लेख केला.

# देवळाली मध्ये सरकारी नोकरी लागणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर ११००० रुपये देऊन करणार सन्मान

## सैन्य दलात निवड झालेल्या दिनेश देशमाने ठरला पहिला सत्कार मुर्ती

**कडा (प्रतिनिधी)**

आष्टी तालुक्यातील देवळाली गावातील मुले मुली सध्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होताना दिसत आहे जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर कोणतेही लक्ष साध्य करता येते यासाठी मोठा वारसा असलाच पाहिजे असे नाही याचे उदाहरण म्हणजे देवळाली गावातील शेतकरी कुटुंबातील मुले मुली एमपीएससीच्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण होत आहे यामुळे देवळाली गावाची मान उंचावली आहे अशा मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी देवळाली गावातील संभाजी तांदळे सर यांनी मुलांना प्रोत्साहन पर ११ हजार रुपये देण्याचा संकल्प केला आहे.



यामुळे मुलांना प्रेरणा मिळून ते अधिक उत्साहाने अभ्यास करू लागतील आणि विविध ठिकाणी नोकरीसाठी प्रयत्न करते आपल्या मित्रांपेक्षा चांगल्या पदावर नोकरी कशी मिळेल याची चुरस विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष दिले पाहिजे आणि म्हणून फूल न् फुलाची पाकळी म्हणून संभाजी तांदळे सर यांनी हा संकल्प केला आहे की देवळाली गावामधील ज्या विद्यार्थ्यांना सरकारी नोकरी लागेल त्यांना ११००० रुपये देऊन सन्मान करण्यात येणार आहे आणि यातून प्रेरणा घेऊन भविष्यात असंख्य विद्यार्थी हे नोकरीसाठी प्रयत्न करतील याची सुरुवात म्हणून नुकत्याच सैन्य दलात अग्निवीर म्हणून निवड झालेल्या दिनेश भाऊसाहेब देशमाने या विद्यार्थ्यास पाच हजार रुपये देऊन सन्मानित करण्यात आले आहे. संभाजी तांदळे सरांनी सुरू केलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे

# वाहिरा येथील १५ ज्येष्ठ नागरिकांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया

## आनंदऋषीजी नेत्रालय व संत शिरोमणी शेख महंमद महाराज प्रतिष्ठानचा उपक्रम

**कडा : प्रतिनिधी**

तालुक्यातील श्रीक्षेत्र वाहिरा येथील श्री संत शिरोमणी शेख महंमद महाराज प्रतिष्ठान व आनंदऋषीजी नेत्रायल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व मोतिबींदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन 13 एप्रिल रोजी करण्यात आले होते. शिबीरात ४० रुग्णांची तपासणी करण्यात आली त्यापैकी



१५ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करावी लागणार असल्याचे तपासणीतून निष्पन्न झाले. त्यानुसार सर्व रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्तविक सोमनाथ शेलार सर यांनी केले तर आभार सदाशिव पगारे सर यांनी मानले. यावेळी संत शिरोमणी शेख महंमद महाराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष ह.भ.प. सिध्दीनाथ मेटे महाराज, सोमनाथ मेटे महाराज, समाधान महाराज नाडकर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. आनंदऋषी हॉस्पिटलचे किरण कवडे, डॉ. अशोक महाडिक, प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड आदींनी विशेष परिश्रम घेतले.